

# डोंगरी निरिक्षण गृह, मुंबई येथील उत्तम पद्धती

# उत्तम पद्धती

- **उत्तम पद्धती 1: पीपीपी(सार्वजनिक खाजगी भागिदारी) पद्धतीने डोंगरी निरिक्षण गृहामध्ये सेवांचा दर्जा सुधारणे**
    - ✓ महिला आणि बाल विकास विभाग, चिल्ड्रेन्स एड सोसायटी(मुंबई) आणि जे एस डब्ल्यु फाउंडेशन यांनी डोंगरी निरिक्षण गृह मुंबई, येथील सेवांचा दर्जा सुधार सुधारण्याकरीता कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (सीएसआर) सामंजस्य करार केला आहे
    - ✓ या सार्वजनिक खाजगी भागिदारी पद्धतीमुळे विभागाला चांगले आरोग्य आणि स्वच्छता या सोबत एकंदर सुधारणा आणि गृहाच्या परिसरात प्रसन्न वातावरणाची निर्मिती करण्यास मदत होते
    - ✓ या भागिदारी ने क्रिडा कार्यक्रम, भिंती रंगविणे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि औद्योगिक सहली इत्यादीं मधील सहभागाने मुलांचा समग्रपणे विकास ई. ची निश्चिती केली आहे.
    - ✓ या सामंजस्य कराराचा भाग म्हणून चिल्ड्रेन्स एड सोसायटी(मुंबई) आणि जे एस डब्ल्यु फाउंडेशन मुलांकरिता कौशल्य विकास उपक्रम आणि व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी करतात.






# उत्तम पद्धती

- **उत्तम पद्धती 2: परसबाग तयार करणे**
    - ✓ बालकांना सुक्ष्म पोषकतत्त्वांनी परिपूर्ण आहार देत असतांनाच भाज्या आणि फळांचा शाश्वत स्त्रोत परिसरातच कमी खर्चात उपलब्ध होईल हे पाहणेही तितकेच महत्वाचे आहे.
    - ✓ हे लक्षात घेऊनच, निरिक्षण गृहाने जेएसडब्ल्युच्या सहाय्याने परिसरात परसबाग तयार केली आहे
    - ✓ जेएसडब्ल्यु फाउंडेशनचे तज्ज्ञ परसबागेच्या विकासाकरिता तसेच देखभालीकरिता देखील मदत करीत आहेत.
    - ✓ सर्वात महत्वाचे म्हणजे या उपक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये बालकांचा सक्रिय सहभाग घेतला जात असल्याने त्यांच्या परसबाग तयार करण्याच्या कौशल्याचाही विकास होतो. याच बरोबरीने निरिक्षण गृहाच्या प्रमुख कामकाजामध्ये आपला सहभाग असल्याची जाणीव बालकांमध्ये निर्माण होते.







# उत्तम पद्धती

- **उत्तम पद्धती 3: बाल आधार**
  - डोंगरी निरिक्षण गृहामधील सर्व निवासी बालकांकरिता बाल आधार क्रमांक निर्माण करण्यात आलेला आहे.
  - यामुळे बालकांना एक खास ओळख प्राप्त होते आणि यामुळे त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेणे शक्य होऊ शकते.
  - त्याच बरोबर बालकांच्या प्रभावी पुनर्वसनाकरिता विभागाला सातत्याने त्यांच्या प्रगतीचा मागोवा घेणे शक्य होईल





